# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११०१८

क क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.३१)**

दिनांक: ०३/१२/२०१९ वेळ: सकाळी ११.३० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभग समितीची माहे डिसेंबर २०१९ ची मासिक सभा मंगळवार दिनांक ०३/१२/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता क क्षेत्रिय कार्यालयाचे “श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह” येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा.नगरदस्य/ सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.बोइनवाड यशोदा प्रकाश | सभापती |
| २) | मा. लांडगे राजेंद्र किसनराव | सदस्य |
| ३) | मा.गीता सुशिल मंचरकर | सदस्य |
| ४) | मा.राहुल हनुमंतराव भोसले | सदस्य |
| ५) | मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर | सदस्या |
| ६) | मा.समीर मोरेश्वर मासुळकर | सदस्य |
| ७) | मा.वैशाली प्रशांत खाडये | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्री.अण्णा बोदडे-क्षेत्रिय अधिकारी, श्री.दिलीप आढारी-प्रशासन अधिकारी, श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.कांबळे बी.बी.सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री.संदेश खडतरे-उपअभियंता नगररचना, श्री.वाईकर-उपअभियंता ज.नि., श्री.बाळु लांडे-उपअभियंता विद्युत, श्री.विनायक माने, श्री.वैभव पुसाळकर, श्री.महेश बरिदे, –उपअभियंता स्थापत्य, श्री.सुनिल बेळगावकर- कनिष्ठ अभियंता बीआरटीएस, श्री.कोटियाना- आरोग्य निरीक्षक पशुवैद्यकीय विभाग, श्रीम.केदारी अ.अ.- क्रिडा पर्यवेक्षक, इ.अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/सदस्या व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करून सभा कामकाज सुरू करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेण्यात आले.

विषय क्र. १ : मा.राहुल हनुमंतराव भोसले यांचा विषय
मौजे पिंपरी वाघेरे (नेहरुनगर दाटवस्ती व परिसर) भागातील २०५ अंतर्गत घोषित केलेल्या रस्त्याचे स्थानांतर करणेबाबत.

विषय क्र. २ : मा.समीर मासूळकर यांचा विषय
प्रभाग क्र.९ मासूळकर कॉलनी मधील जुने शौचालय काढून टाकणेबाबत.

विषय क्र. ३ : मा.समीर मासूळकर यांचा विषय
प्रभाग क्र.९ मासूळकर कॉलनी येथील भाजी मंडई मध्ये बॉक्सींग साठी सोय करणेबाबत.

विषय क्र. ४ : मा.यशोदा बोइनवाड यांचा विषय
स्व्च्छता अभियान अंतर्गत सन्मा. नगरसदस्यांचा राजस्थान अभ्यास दौरा आयोजन करणेबाबत.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १४ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : ०३/१२/२०१९ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.राहुल हनुमंतराव भोसले | अनुमोदक | : मा.समीर मासुळकर |

संदर्भ : मा. राहुल हनुमंतराव भोसले यांचा ऐनवेळेचा विषय
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे

मौजे पिंपरी वाघेरे (नेहरुनगर दाटवस्ती व परिसर) या भागात विकास योजनेच्या रस्त्या व्यतीरिक्त आवश्यकतेनुसार १०.१५ व २०.०० फुट रुंदीचे (म्युनिसिपल रोड) कलम २०५ अन्वये घोषित केलेला आहे. सदर घोषित रस्त्यांमध्ये पिंपरी वाघेरे स.नं.१०२ पै. मधील सि.स.नं. ५०३५, ५०३०, ५०२९, ५०१२ या मिळकतीमधून व जवळून १५ फुट रस्ता प्रस्तावित केलेले आहे. परंतु सदरचा रस्ता नागरीकांच्या इमारतीवरुन जात आहे. त्यामुळे सदर रस्ता विकसित करणेसाठी नागरीकांचा प्रचंड विराध आहे. सदर रस्त्याच्या पूर्वेला नाला असून नाल्यालगत जागेवर ६ ते ७ मिटर रुंद रस्ता अस्तित्वात आहे. त्यामुळे यापूर्वी २०५ अन्वये घोषित केलेला १५ फुट रस्ता रद्द करुन पूर्वेकडील नाल्याच्या बाजुचा जागेवरील रस्ता ७.०० मी. आहे. सदर रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देण्यात येत आहे. सदरचा विषय पुढील कार्यवाहीसाठी नगर रचना विभागाकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १५ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : ०३/१२/२०१९ | विभाग | : स्थापत्य/ आरोग्य |
| सुचक | : मा. समीर मासुळकर | अनुमोदक | : मा. राहुल हनुमंतराव भोसले |

संदर्भ : मा. समीर मोरेश्वर मासुळकर यांचा ऐनवेळेचा विषय
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र.९ मासुळकार कॉलनी मधील हेगडेवार फुटबॉल मैदानालगत असलेले मनपाचे शौचालय हे खूप जूणे असून धोकादायक झालेले आहे, तसेच ते वापरात नसल्याने काढून टाकणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करण्यात यवी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १६ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : ०३/१२/२०१९ | विभाग | : स्थापत्य/ क्रिडा |
| सुचक | : मा. समीर मासुळकर | अनुमोदक | : मा. राहुल भोसले |

संदर्भ : मा. समीर मोरेश्वर मासुळकर यांचा ऐनवेळेचा विषय
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र.९ मध्ये नविन पोलीस स्टेशन समोरील भाजी मंडईचे गाळे विनावापर पडून

आहेत. कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयमची इमारत धोकादायक झालेली असलेमुळे ती पाडणेत येणार आहे. सदर इमारतीमध्ये असलेले बॉक्सींगचे स्टेज प्रभाग क्र.९ मधील भाजी मंडईचे गाळयात स्थलांतरीत करणेस तसेच सदर बॉक्सींगचे मैदान/ग्राउंड तयार करणेकामी आवश्यक ती सर्व स्थापत्य व विद्युत विषयक कामे चालू असलेल्या कामांमधून करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १७ | विषय क्रमांक | : | ४ |
| दिनांक | : | ०३/१२/२०१९ | विभाग | : | प्रशासन/ लेखा |
| सुचक | : | मा. यशोदा प्रकाश बोइनवाड | अनुमोदक | : | मा. गीता सुशील मंचरकर |

संदर्भ : मा. यशोदा प्रकाश बोइनवाड यांचे दि. ०३/१२/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे

मा.क प्रभाग समिती सदस्यांकरीता स्व्च्छता अभियान अंतर्गत राजस्थान अभ्यास दौरा दि.30/01/2020 ते 03/02/2020 या कालावधीत आयोजित करायचा आहे. सदरचे अभ्यास दौऱ्यामध्ये शहर स्वच्छता, कचरा विल्हेवाट, शाळांमधील स्वच्छता प्रकल्प, पर्यटन स्थळावरील स्वच्छता नियोजन इ.बाबत राजस्थानातील जयपूर, उदयपूर इ. ठिकाणी भेटी द्यायच्या आहेत. सदर दौऱ्यासाठी क प्रभाग समिती दसस्य व क प्रभागातील ४ अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात यवी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(बोइनवाड यशोदा प्रकाश)
सभापती (क प्रभाग समिती)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय कार्यालय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी -२६
जा.क्र. कक्षेका/सभा/कावि/ ११३ /२०१९
दि. ३० /१२/२०१९
प्रत: सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी

सभावृत्तांतामधील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.